# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ 6164 /२०१९ पुणे शहर, दिनांक १९/०७/२०१९

**विषय :- शेअर रिक्षा बाबत बैठक संपन्न झाले बाबत.**

---

आज दिनांक १९/०७/२०१९ रोजी १७.०० ते १८.३० वा. चे दरम्यान पोलीस आयुक्त कार्यालय कॉन्फरन्स हॉल पुणे येथे पोलीस उप आयुक्त, वाहतुक पंकज देशमुख यांचे अध्यक्षतेखाली पुणे शहरातील रिक्षा संघटनांचे पदाधिकारी प्रतिनिधी यांची समन्वय बैठक संपन्न झाली.

सदर बैठकीत पुणे शहरात विविध मार्गावर शेअररिक्षा चालविण्याबाबत उपस्थित रिक्षासंघटनांचे पदाधिकारी,प्रतिनिधी यांचे म्हणने समजावून घेण्यात आले, त्यामध्ये सर्वाधिक प्रतिनिधी यांनी शेअर रिक्षा चालविण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दिला असून बैठकीत रिक्षा सबंधित समस्याकरीता एक समिती नेमून त्या समितीच्या पुढील बैठका घेवून शहरात शेअर रिक्षा चालविण्याबाबतचे मार्ग ठरविणे, भाडे ठरविणे, कायदेशीर बाबी तपासणी वगैरे निर्णय घेवून शेअर रिक्षा चालविण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

सदर बैठकीस सहा पोलीस आयुक्त सुरेंद्र देशमुख वाहतुक शाखा, सहा.प्रादेशिक परिवहन अधिकारी दत्तात्रय सांगोलकर,पोलीस निरीक्षक,नियोजन-- कळसकर तसेच शहरातील ४४ रिक्षा संघटनांचे पदाधिकारी,प्रतिनिधी उपस्थित होते.